N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** वेदांत नगर **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0018 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/02/2026 12:37 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 06/02/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 06/02/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 14:15 तास **Time To (वेळेपर्यंत):** 14:46 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 10/02/2026 **Time (वेळ):** 11:06 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 010 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 10/02/2026 11:06 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** प्रादेषिक परिवहन कार्यालय,, छत्रपती संभाजीनगर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):** (महाराष्ट्र)



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पो. नि. राजु बबन आल्हाट

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
| --- | --- | --- |

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
| --- | --- | --- |
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, अहिल्यानगर,, छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, अहिल्यानगर,, छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9420896263

Scanned with OKEN Scanner

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | एजंट श्री. साहिल उर्फ भिमराव लक्ष्मण पवार | | | 1. वडारवाडी चौकाच्या,Town/Village (शहर / गाव): बाजुला,शिवाजीनगर,पुणे,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): छत्रपती संभाजीनगर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद दि.10/02/2026

मी राजु बबन आल्हाट, वय 38 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 9420896263.



Scanned with OKEN Scanner

समक्ष वेदांतनगर पोलीस स्टेशन,छ.संभाजीनगर पोलीस आयुक्तालय येथे हजर राहुन सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर दिनांक 10/07/2023 पासुन कार्यरत आहे.

दि.05/02/2026 रोजी श्री.अजित त्रिपुटे,पोलीस उपअधीक्षक,ला.प्र.वि.अहिल्यानगर यांनी एका तक्रारदाराचा मोबाईल क्रमांक देवुन सदर मोबाईल क्रमांकावर संपर्क करून तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे पुढील कारवाई करणेबाबत आदेशीत केलेले होते त्याप्रमाणे आम्ही श्री. अजय पोपट मखरे यांचेशी संपर्क करून त्यांचे तक्रारीबाबत माहिती घेतली असता त्यांनी लोकसेवका करीता खाजगी इसम लाच मागणी करत असलेबाबत तक्रार सांगितली. व ते खाजगी इसमांस दि. 06/02/2026 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे भेटणार असलेबाबत सांगितले.तक्रारदार यांनी सांगितलेल्या तक्रारी नुसार लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा होत असल्याने आम्ही मा.आयुक्त सो,महानगरपालीका, अहिल्यानगर यांना पत्र देवुन दोन कर्मचारी पंच साक्षीदार म्हणुन उपलब्ध करून घेवुन त्यांना एका तक्रारदाराकडे लोकसेवकाकरीता खाजगी इसम लाच मागणी करत असलेबाबत तक्रारीचा आषय सांगितला व सदर तक्रारदार हे खाजगी इसमांस दिनांक 06/02/2026 रोजी छ.संभाजीनगर येथे भेटणार असल्याचे पंचांना सांगुन तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे पुढील कारवाई करणेबाबत सांगुन नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांना सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय?याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोकाॅ गायकवाड, पोकाॅ सुदुरक, पोकाॅ वाघ यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाशी ओळख करून दिली व नमुद पंच साक्षीदार तसेच सापळा पथकातील कर्मचा-यांना दिनांक 06/02/2026 रोजी सकाळी 07/30 वा.चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात हजर राहणेबाबत कळविले.

आम्ही दिलेल्या सुचनांप्रमाणे दि. 06/02/2026 रोजी अहिल्यानगर महानगरपालिका येथील दोन पंच साक्षीदार तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील कर्मचारी हे 07/30 वा.चे सुमारास कार्यालयात हजर झालेनंतर आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवष्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकीय वाहन क्र. एमएच-16 डि.डब्ल्यु 7014 ने 07.55 वा. निघुन अहिल्यानगर-घोडेगाव-नेवासा मार्गे 11/05 वा. चे दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील सुरक्षित ठिकाणी पोहचलो. त्यानंतर तक्रारदार हे पायी चालत आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. अजय पोपट मखरे, वय - 26 वर्षे, व्यवसाय- मॅनेजर, नवनाथ ट्रान्सपोर्ट शिरूर, पुणे, हल्ली. रा. म्हस्के मळा, ता.शिरूर, जि.पुणे, मुळ रा. राजवाडा, इंदापुर, जि.पुणे. असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, "मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. मी नवनाथ ट्रान्सपोट,शिरूर,जि.पुणे येथे मागील चार वर्षापासुन मॅनेजर म्हणुन काम करीत असुन नवनाथ ट्रान्सपोर्टचे प्रोपरायटर नवनाथ म्हस्के व त्यांचे भाउ अमोल म्हस्के व राजेश म्हस्के आहेत.नवनाथ म्हस्के व त्यांचे भावांच्या मालकीचे एकुण 16 ट्रेलर व 1 सहा टायर ट्रक असुन नवनाथ म्हस्के यांचे ट्रेलर वाहनातुन वर्धा येथील सिटल कंपनीतुन पुणे येथे लोखंडी सळई वाहतुक केली जाते.सदर वाहतुकीकरीता नवनाथ ट्रान्सपोर्ट मधील 6 ट्रेलर वाहनाने दर महिन्याला वर्धा ते पुणे लोखंडी सळई

वाहतुक केली जाते.सदर वाहतुक करत असताना छ.संभाजीनगर जिल्हयामध्ये ट्रेलर वाहन आल्यानंतर आरटीओ कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथील अधिकारी रात्री सदर ट्रेलर अडवुन ओव्हरलौडींग कारवाईची भिती दाखवुन ब-याचदा पैसे घेत असतात तसेच दर महिना पैशांची मागणी करत असतात.त्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्हयामधुन ट्रेलर वाहनाची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यसाठी व आरटीओ कार्यालयामधील अधिका-यांकडुन ओव्हरलौडींगची कारवाई न करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील आरटीओ कार्यालयामध्ये खाजगी एजंट म्हणुन काम करणारे श्री.साहिल पवार यांनी माझेषी संपर्क केला होता व सदर खाजगी एजंट साहिल पवार हा माझेकडुन मागील 2 महिन्यापासुन आरटीओ कार्यालयातील अधिका-यांसाठी दर महिना हप्ता म्हणुन 20,000/- रूपये घेत आहे.जानेवारी 2026 मध्ये नवनाथ ट्रान्सपोर्ट मधील ट्रेलर वाहन क्रमांक एम एच 12,व्हि एफ 9811 व एम एच 12,के.व्हि.7272 या वाहनांवर छत्रपती संभाजीनगर येथील आरटीओ अधिका-यांनी ओव्हरलौडिंगची कारवाई केली. त्यावेळी माझा आरटीओ कार्यालयातील खाजगी एजंट श्री.साहिल पवार याचेसोबत संपर्क झाला त्यावेळी त्याने मला सांगितले की, आरटीओ कार्यालयातील दुस-या अधिका-यांनी ट्रेलर वाहनावर कारवाई केली आहे.तरी यापुढे नवनाथ ट्रान्सपोर्ट च्या ट्रेलर वाहनांवर कारवाई होणार नाही तुम्ही मला फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयात भेटा,आपण सविस्तर बोलु.असे सांगितले.

तरी आरटीओ कार्यालयातील खाजगी एजंट श्री.साहिल पवार हे नवनाथ ट्रान्सपोर्ट च्या ट्रेलर वाहनांवर ओव्हर लौडींगची कारवाई न करण्यासाठी तसेच छत्रपती संभाजीनगर हद्दिमध्ये ट्रेलर वाहनांची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी आरटीओ कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथील अधिका-यांसाठी दर माहिना हप्ता म्हणुन 20,000/- रूपये लाचेची मागणी करत आहे.मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. सदर बाबत मी नवनाथ ट्रान्सपोर्ट चे मालक श्री.नवनाथ म्हस्के यांचेशी चर्चा केली त्यावेळी मला व नवनाथ म्हस्के यांना आरटिओ कार्यालयातील अधिका-यांसाठी लाच देण्याची ईच्छा नसल्याने आज रोजी मी आरटीओ कार्यालयाजवळ जावुन आरटीओ कार्यालयातील खाजगी एजंट श्री.साहिल पवार यांची भेट घेणार आहे व नवनाथ ट्रान्सपोर्ट च्या ट्रेलर च्या वाहतुकीबाबत चर्चा करणार आहे.त्यावेळी त्यांनी नवनाथ ट्रान्सपोर्टची ट्रेलर वाहने छत्रपती संभाजीनगरच्या हद्दीतुन सुरळित चालु देण्याकरीता व ट्रेलर वाहनांवर ओव्हरलोडची कारवाई न करण्याकरीता आरटीओ कार्यालयातील अधिका-यांकरीता लाचेची मागणी केल्यास मी त्यांना माझी आरटीओ कार्यालयातील अधिका-यासोबत भेट घालुन दया अशी विनंती करणार आहे. आरटीओ कार्यालयातील अधिका-यांची भेट झाल्यानंतर मी त्यांचेषी नवनाथ ट्रान्सपोर्टच्या ट्रेलर च्या वाहतुकीबाबत चर्चा करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी.

माझ्यात व आरटीओ कार्यालयातील अधिकारी व त्यांचे खाजगी एजंट श्री.साहिल पवार यांचेत कुठल्याही प्रकारचा आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही. तसेच भांडणतंटा अगर वैर नाही. खाजगी एजंट श्री.साहिल पवार व आरटीओ कार्यालयातील अधिका-यांनी लाचेची मागणी केल्यास सदर रक्कम मी नवनाथ ट्रान्सपोर्टच्या बचतीतुन हजर करील.यासोबत मी नवनाथ ट्रान्सपोर्ट येथे मॅनेजर म्हणुन काम करत असलेबाबतचे प्रमाणपत्र,नवनाथ ट्रान्सपोर्ट चे मालक नवनाथ म्हस्के यांनी मा.महासंचालक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना दिलेला तक्रारी अर्ज, हजर

करीत आहे." अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारी वर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री. मखरे यांचे तक्रारीप्रमाणे खाजगी एजंट साहिल पवार व आरटीओ कार्यालयातील अधिकारी यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाॅईस रेकाॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री. अजय मखरे व दोन्ही पंचांना माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकाॅर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यांनंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. अजय मखरे यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. अजय मखरे असे छ.संभाजीनगर येथे सुरक्षित ठिकाणी उपस्थित असलेबाबत निवेदन ध्वनिमुद्रित केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.मखरे यांना खाजगी एजंट श्री.साहिल पवार कोठे भेटतील याबाबत विचारले असता त्यांनी खाजगी एजंट श्री.पवार हे आरटिओ कार्यालय,छ.संभाजीनगर येथे भेटणार असल्याचे सांगितले. त्यानुसार आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून तक्रारदार श्री.मखरे यांच्या गळयात कोणासही दिसणार नाही अषा पध्दतीने अडकवुन आम्ही तक्रारदार व पंच नं.1 यांना आरटिओ कार्यालय,छ.संभाजीनगर येथे 11/46 वाजता रवाना केले. त्यानंतर 12/15 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना खाजगी एजंट पवार यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होवुन आरटिओ कार्यालय,छ.संभाजीनगर येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार व एजंट पवार मागील महिन्यामध्ये गाडयांवर केलेल्या कारवाईबाबत चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार श्री.मखरे हे खाजगी एजंट पवार यांना म्हणाले कि, थोडं कमी करता का? त्यावर खाजगी एजंट म्हणाले कि,कमी काहि होणार नाही.साहेब म्हणाले कुणाकडुन एक रूपया कमी घ्यायचा नाही.जो रेट आहे तोचं घ्यायचा त्यावर तक्रारदार यांनी कुठले साहेब असे विचारले असता खाजगी एजंट पवार यांनी कांतोळे साहेब,जोगे साहेब चैघेजण आहेत.असे सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांना फोन लावुन विचारण्याकरीता विनंती केली असता खाजगी एजंट पवार यांनी साहेब कामात आहेत,फोन उचलत नाहीत. त्यानंतर तक्रारदार यांनी गाडीवर कोणत्या साहेबांनी फाईन लावले विचारले असता खाजगी एजंट पवार म्हणाले कि,ते नाही सांगता यायचं,आपण फक्त चार लोकासाठीच काम करतो विजय कातोळे,आशिष खंडागळे,शशिकांत जोगे,राजु नांगरे हे आपल्याला पेमेंट देतात,महिन्याला तीस हजार रूपये, त्यानंतर तक्रारदार मखरे यांनी किती दयायचे तुम्हाला असे विचारले असता खाजगी एजंट म्हणाले कि,मी विचारतो साहेबांना मग सांगतो त्यावर तक्रारदार मखरे यांनी एकदा फोन लावुन विचारा असे म्हणुन मी सोबत तक्रारदार मखरे असे सापळा पथक थांबल्या ठिकाणी पायी परत आल्याची हकिगत सांगितली,त्यांनतर तक्रारदार यांना पंचासमक्ष हकिगत विचारली असता त्यांनी पंच नं.1 यांनी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे हकिगत सांगितली.



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार व पंच नं 01 यांनी सांगितलेल्या हकिकती वरून व रेकॉर्ड झालेल्या संभाषणा वरून खाजगी एजंट पवार यांनी तक्रारदार यांच्याकडे नवनाथ ट्रान्सपोर्ट च्या ट्रेलर वाहनांवर ओव्हर लोंडींगची कारवाई न करण्यासाठी तसेच छत्रपती संभाजीनगर हद्दिमध्ये ट्रेलर वाहनांची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी लाचेची मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले परंतु सदर लाच मागणी स्पष्ट नसल्याने व खाजगी एजंट पवार यांनी साहेबांना विचारून सांगतो असे तक्रारदार यांना सांगितल्याने खाजगी एजंट पवार यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रकमेमध्ये स्पष्टता येण्यासाठी खाजगी एजंट पवार यांची तक्रारदार यांनी पुन्हा पंच नं.1 यांचे सह जावुन भेट घेण्याचे ठरले त्याप्रमाणे तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार श्री.मखरे यांच्या गळयात कोणासहि दिसणार नाही अशा पध्दतीने अडकवुन आम्ही तक्रारदार व पंच नं.1 यांना आरटिओ कार्यालय,छ.संभाजीनगर येथे 14/15 वाजता रवाना

त्यानंतर 12/15 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना खाजगी एजंट पवार यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होवुन आरटिओ कार्यालय,छ.संभाजीनगर येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार व एजंट पवार मागील महिन्यामध्ये गाडयांवर केलेल्या कारवाईबाबत चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार श्री.मखरे हे खाजगी एजंट पवार यांना म्हणाले कि, थोडं कमी करता का? त्यावर खाजगी एजंट म्हणाले कि,कमी काहि होणार नाही.साहेब म्हणाले कुणाकडुन एक रूपया कमी घ्यायचा नाही.जो रेट आहे तोचं घ्यायचा त्यावर तक्रारदार यांनी कुठले साहेब असे विचारले असता खाजगी एजंट पवार यांनी कातोळे साहेब,जोगे साहेब चैघेजण आहेत.असे सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांना फोन लावुन विचारण्याकरीता विनंती केली असता खाजगी एजंट पवार यांनी साहेब कामात आहेत,फोन उचलत नाहीत. त्यानंतर तक्रारदार यांनी गाडीवर कोणंत्या साहेबांनी फाईन लावले विचारले असता खाजगी एजंट पवार म्हणाले कि,ते नाही सांगता यायचं,आपण फक्त चार लोकासाठीच काम करतो विजय कातोळे,आशिष खंडागळे,शशिकांत जोगे,राजु नांगरे हे आपल्याला पेमेंट देतात,महिन्याला तीस हजार रूपये, त्यानंतर तक्रारदार मखरे यांनी किती दयायचे तुम्हाला असे विचारले असता खाजगी एजंट म्हणाले कि,मी विचारतो साहेबांना मग सांगतो त्यावर तक्रारदार मखरे यांनी एकदा फोन लावुन विचारा असे म्हणुन मी सोबत तक्रारदार मखरे असे सापळा पथक थांबल्या ठिकाणी पायी परत आल्याची हकिगत सांगितली,त्यांनतर तक्रारदार यांना पंचासमक्ष हकिगत विचारली असता त्यांनी पंच नं.1 यांनी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे हकिगत सांगितली.

तक्रारदार व पंच नं 01 यांनी सांगितलेल्या हकिकती वरून व रेकॉर्ड झालेल्या संभाषणा वरून खाजगी एजंट पवार यांनी तक्रारदार यांच्याकडे नवनाथ ट्रान्सपोर्ट च्या ट्रेलर वाहनांवर ओव्हर लोंडींगची कारवाई न करण्यासाठी तसेच छत्रपती संभाजीनगर हद्दिमध्ये ट्रेलर वाहनांची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी लाचेची मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले परंतु सदर लाच मागणी स्पष्ट नसल्याने व खाजगी एजंट पवार यांनी साहेबांना विचारून सांगतो असे तक्रारदार यांना सांगितल्याने खाजगी एजंट पवार यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रकमेमध्ये स्पष्टता येण्यासाठी



Scanned with OKEN Scanner

खाजगी एजंट पवार यांची तक्रारदार यांनी पुन्हा पंच नं.1 यांचे सह जावुन भेट घेण्याचे ठरले त्याप्रमाणे तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार श्री.मखरे यांच्या गळयात कोणासहि दिसणार नाही अशा पध्दतीने अडकवुन आम्ही तक्रारदार व पंच नं.1 यांना आरटिओ कार्यालय,छ.संभाजीनगर येथे 14/15 वाजता रवाना केले. त्यानंतर 14/46 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्या ठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना खाजगी एजंट पवार यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की,खाजगी एजंट पवार यांनी तक्रारदार यांचे कडे त्यांचेकडील 6 गाडयांचे या महिन्यातील छ.संभाजीनगर जिल्हयामधील वाहतुकिचे प्रत्येकी 3500/- रूपयांप्रमाणे 21,000/- रूपये लाचेची मागणी केली त्यावेळी तक्रारदार यांनी खाजगी एजंट पवार यांचेकडे साहेबांची भेट घालुन देण्याकरीता विनंती केली असता खाजगी एजंट पवार यांनी साहेब नसल्याचे सांगुन साहेब असले असते तर भेट घालुन दिली असती, असे सांगितले व साहेब आल्यानंतर कळवतो असे सांगितल्याने मी व तक्रारदार असे तेथुन निघुन सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आल्याचे सांगितले. त्यांनतर तक्रारदार यांना पंचासमक्ष हकिगत विचारली असता त्यांनी पंच नं.1 यांनी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे हकिगत सांगितली. तक्रारदार व पंच नं 01 यांनी सांगितलेल्या हकिकती वरून व रेकॉर्ड झालेल्या संभाषणा वरून आरटिओ कार्यालय,छ.संभाजीनगर येथील खाजगी एजंट पवार यांनी तक्रारदार यांच्याकडे नवनाथ ट्रान्सपोर्ट च्या ट्रेलर वाहनांवर ओव्हर लोंडींगची कारवाई न करण्यासाठी तसेच छत्रपती संभाजीनगर हद्दिमध्ये ट्रेलर वाहनांची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी आरटिओ कार्यालयातील अधिकारी श्री.विजय कातोळे,श्री.शशीकांत जोगे,श्री.आशिष खंडागळे व श्री.राजु नागरे यांचेकरीता 21,000/- रूपये लाचेची मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले तसेच कार्यालयात साहेब असते तर भेट घालुन दिली असती असे सांगुन अधिकारी आल्यावर सांगतो असे खाजगी एजंट पवार यांनी सांगितल्याने आरटिओ कार्यालयामध्ये श्री.विजय कातोळे,श्री.जोगे,श्री.खंडागळे व श्री.नागरे यांची खाजगी एजंट पवार यांचे मार्फतीने भेट घेण्याचे ठरले.त्यानंतर खाजगी एजंट पवार यांचा बराच वेळ कॉल न आल्याने तक्रारदार यांचेकडील मोबाईल क्रमांकावरून खाजगी एजंट पवार यांना कॉल केला असता खाजगी एजंट यांनी साहेब कार्यालयात आले नसल्याचे सांगितले व सोमवारी नेतो भेटायला असे सांगितल्याने सदर लाचमागणी पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित केली व सोमवारी दिनांक 09/02/2026 रोजी खाजगी एजंट पवार यांनी आरटिओ कार्यालयातील अधिका-यांची तक्रारदार यांची भेट घालुन देणार असल्याचे सांगितल्याने दिनांक 09/02/2026 रोजी आरटिओ कार्यालयातील अधिका-यांची खाजगी एजंट पवार यांचे मार्फतीने लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.मखरे यांना गोपनियता राखण्याच्या सुचना दिल्या व दिनांक 09/02/2026 रोजी 11/00 वा.छ.संभाजीनगर येथे सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत सुचना दिल्या तसेच दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि.कार्यालयातील कर्मचा-यांना दिनांक 09/02/2026 रोजी सकाळी 07/30 वा.हजर राहणेबाबत तसेच गोपननियता राखणेबाबत योग्य त्या सुचना दिल्या.त्यानंतर झालेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईबाबत दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा केला आहे. आम्ही दिनांक 06/02/2026 रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे दि. 09/02/2026 रोजी दोन पंच साक्षीदार



Scanned with OKEN Scanner

तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील कर्मचारी पोना/काळे,पोकॉ/सुद्रुक व पोकॉ/वाघ हे 07/30 वा.चे सुमारास कार्यालयात हजर झालेनंतर आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकीय वाहन क्र. एमएच-16 डि.डब्ल्यु 7014 ने 08.05 वा. निघुन अहिल्यानगर-घोडेगाव-नेवासा मार्गे 10/25 वा. चे दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील सुरक्षित ठिकाणी पोहचलो. त्यानंतर तक्रारदार हे पायी चालत आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.मखरे यांना खाजगी एजंट श्री.साहिल पवार कोठे भेटतील याबाबत विचारले असता त्यांनी खाजगी एजंट श्री.पवार हे आरटिओ कार्यालय,छ.संभाजीनगर येथे भेटेल असे सांगितले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत व खाजगी एजंट पवार यांचे मार्फतीने आरटिओ कार्यालयातील अधिका-यांची भेट झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत तक्रारदार व पंच नं. 1 यांना योग्य त्या सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार श्री.मखरे यांच्या गळयात कोणासही दिसणार नाही अषा पध्दतीने अडकवुन आम्ही तक्रारदार व पंच नं.1 यांना आरटिओ कार्यालय,छ.संभाजीनगर येथे 11/40 वाजता रवाना केले. त्यानंतर 12/22 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना खाजगी एजंट पवार यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विशयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार असे रवाना होवुन आरटिओ कार्यालयात गेलो असता तेथे खाजगी एजंट पवार मिळुन आले नाही त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांकावरून खाजगी एजंट पवार यांचे मोबाईल क्रमांकावर फोन केले परंतु खाजगी एजंट पवार यांनी तक्रारदार यांचा फोन उचलला नाही व त्यांनतर आम्ही काही वेळ एजंट पवार यांची वाट बघितल्यानंतर कोणास संशय येवु नये म्हणुन सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो.अशी हकिगत सांगितली. त्यांनतर तक्रारदार यांना पंचासमक्ष हकिगत विचारली असता त्यांनी पंच नं.1 यांनी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे हकिगत सांगितली. खाजगी एजंट पवार हे तक्रारदार यांचा फोन उचलत नसल्याने खाजगी एजंट पवार यांच्या फोन येण्याची वाट बघण्याचे ठरले.त्यानंतर 17/05 वा. ते 17/15 वा.दरम्यान खाजगी एजंट पवार यांचे मोबाईल क्रमांकावरून तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांकावर बोलणे झाले त्यावेळी खाजगी एजंट पवार यांनी ते आरटिओ कार्यालयातील खंडागळे साहेब यांचेसोबत वेरूळ टोलनाका येथे असल्याचे सांगितले व तक्रारदार यांना वेरूळ टोलनाका येथे भेट घेण्यासाठी बोलाविले असल्याचे सांगितले सदर खाजगी एजंट पवार व तक्रारदार यांचे कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आले.खाजगी एजंट पवार यांनी सांगितल्याप्रमाणे वेरूळ टोलनाका येथे जावुन लोकसेवक खंडागळे यांची लाच पडताळणी करण्याचे ठरले त्याप्रमाणे तक्रारदार यांना शासकिय वाहनामध्ये बसवुन आमचे सुचनेप्रमाणे शासकिय वाहन चालक पोहवा लाड यांनी वाहन समृध्दी महामार्गाने वेरूळ टोलनाका येथे आणल्यानंतर आम्ही सापळा पथकासह टोलनाक्यापासुन थोडे दुर सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो त्यावेळी सुमारे 19/00 वा.चे सुमारास खाजगी एजंट पवार हे तक्रारदार याना टोलनाक्याच्या बाजुकडे बोलावुन घेतले त्यावेळी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार श्री.मखरे यांच्या गळयात कोणासही दिसणार नाही अशा पध्दतीने



Scanned with OKEN Scanner

अडकवुन आम्ही तक्रारदार व पंच नं.1 यांना टोलनाक्याच्या दिशेने 19/05 वाजता रवाना केले. त्यानंतर 19/09 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना खाजगी एजंट पवार यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार असे टोलनाक्याच्या जवळ गेलो असता त्याठिकाणी खाजगी एजंट पवार तसेच आरटिओ कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक श्री.खंडागळे व तक्रारदार यांचे परिचयाचे इसम उभे होते त्यावेळी तक्रारदार,मोटार वाहन निरीक्षक श्री.खंडागळे व तक्रारदार यांचे परिचयाचे इसम यांच्या मध्ये तक्रारदार यांचेकडील वाहनावर केलेल्या दंडात्मक कारवाईबाबत चर्चा झाली सदर चर्चे दरम्यान मोटार वाहन निरीक्षक श्री.खंडागळे यांनी तक्रारदार यांचे लाचेची मागणी केली नाही व त्यानंतर मोटार वाहन निरीक्षक श्री.खंडागळे हे तेथुन निघुन गेल्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आल्याची हकिगत सांगितली. त्यांनतर तक्रारदार यांना पंचासमक्ष हकिगत विचारली असता त्यांनी पंच नं.1 यांनी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे हकिगत सांगनु त्यांचे परिचयाचे श्री.पांडुळे हे त्याठिकाणी हजर असल्याचे सांगितले. तक्रारदार व पंच नं 01 यांनी सांगितलेल्या हकिकती वरून व रेकॉर्ड झालेल्या संभाषणा वरून तक्रारदार व मोटार वाहन निरीक्षक श्री.खंडागळे यांचे भेटि दरम्यान मोटार वाहन निरीक्षक श्री.खंडागळे यांनी लाचेची मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर मोटार वाहन निरीक्षक श्री.खंडागळे हे त्याठिकाणाहुन निघुन गेल्याने आम्ही सापळा पथक व तक्रारदार यांचेसह छ.संभाजीनगर शहराकडे समृध्दी महामार्गाने येत असताना खाजगी एजंट पवार यांचे तक्रारदार यांना वारंवार कॉल येत असल्याने व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन खाजगी एजंट पवार यांचा कॉल ध्वनीमुद्रित करण्याचे ठरले त्याप्रमाणे तक्रारदार यांना खाजगी एजंट पवार यांचा येणारा कॉल रेकॉर्ड केला असता खाजगी एजंट यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितली त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचेकडे 20000/- रूपये असल्याचे सांगितले व कोणाकडे दयायचे याबाबत विचारणा केली असता खाजगी एजंट पवार यांनी सदर लाच रक्कम 20000/- रूपये त्यांचेकडे देण्याबाबत सांगुन छ.संभाजीनगर शहरातील बाबा पेट्रोल पंपाचे बाजुला असलेल्या बसस्टॅड मागील मोठया ग्राउंडवर भेटणार असल्याचे निष्पन्न झाले.

आम्ही तक्रारदार यांना खाजगी एजंट पवार यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता त्यांनी त्यांच्याकडील 20000/- रूपयांच्या 40 भारतीय चलनी नोटा हजर केल्या त्यांनी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. तक्रारदार व पंचाना अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोकॉ वाघ यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सापळा कारवाई दरम्यान करावयाच्या कार्यवाही बाबत सर्वांना सुचना समजावुन सांगितल्या.

त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांना योग्य त्या सुचना समजावुन सांगुन लाचेच्या नोटा व व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे ताब्यात देण्यात आले. तक्रारदार व पंच नं. 1 यांना खाजगी एजंट पवार यांची भेट घेण्याकरीता ग्राउंडवर 21.21 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक देखील रवाना झाले व ग्राउंडवरील शनीमंदिराजवळ सापळा लावुन थांबले त्यानंतर काही वेळाने



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार यांनी लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा 21/24 वाजता केला. लागलीच आम्ही पंच नं. 2 व सापळा पथकासह जावुन लाच रक्कम स्विकारणा-या खाजगी एजंट पवार यांना लाच रकमेसह ताब्यात घेतले व पंच नं.2 करवी त्यांचे ताब्यातील लाचेच्या नोटा हस्तगत केल्या. आम्ही सदर इसमांस त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव साहिल उर्फ भिमराव लक्ष्मण पवार,वय-21 वर्षे,धंदा- खाजगी एजंट,रा.391,वडारवाडी,कुसाळकर चौकाच्या बाजुला,शिवाजीनगर,पुणे असे सांगितले. त्यानंतर आम्ही खाजगी एजंट पवार यांचे हाताची तसेच लाचेच्या नोटांची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली व पंचनाम्याचे पुढील कामकाज शासकिय विश्रामगृह,छ.संभाजीनगर येथे केले.

तरी दिनांक 06/02/2026 रोजी 14/15 ते 14/46 वाजेच्या दरम्यान प्रादेशिक परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे लाचमागणी पडताळणी वेळी यातील खाजगी एजंट साहिल उर्फ भिमराव लक्ष्मण पवार,वय-21 वर्षे,धंदा- खाजगी एजंट,रा.391,वडारवाडी,कुसाळकर चैकाच्या बाजुला,शिवाजीनगर,पुणे यांनी तक्रारदार यांच्याकडे नवनाथ ट्रान्सपोर्ट च्या ट्रेलर वाहनांवर ओव्हर लोंडींगची कारवाई न करण्यासाठी तसेच छत्रपती संभाजीनगर हद्दिमध्ये ट्रेलर वाहनांची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी आरटिओ कार्यालयातील अधिकारी श्री.विजय कातोळे, श्री.शशीकांत जोगे, श्री.आशिष खंडागळे व श्री.राजु नागरे यांचेकरीता 21,000/- रूपये लाचेची मागणी केली व त्यापैकी 20,000/-रूपये लाच रक्कम दिनांक 09/02/2026 रोजी 21/21 ते 21/24 वाजेच्या दरम्यान आपल्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करून घेण्याचे हेतुने, कायदेषीर परिश्रमीका खेरीज अन्य पारितोषण म्हणुन बेकायदेशीर मार्गाने बक्षीस स्विकारून भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेतला म्हणुन खाजगी एजंट श्री. साहिल उर्फ भिमराव लक्ष्मण पवार,वय-21 वर्षे,धंदा- खाजगी एजंट,रा.391,वडारवाडी, कुसाळकर चैकाच्या बाजुला,शिवाजीनगर,पुणे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 (अ) प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे. म्हणुन मा,पोन.नि.सो यांच्या आदेशाने दाखल करुन पुढील तपास पोलीस नि. राजु आल्हाट ला.प्र.वि अहिल्यानगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** PRAVINA TARACHAND YADAV (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (**तपास करण्याचे अधिकार दिले**) or (किंवा)**

(3)



Scanned with OKEN Scanner

Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

डयुटी ऑफीसर
पो.ठाणे वेदांतनगर
छ. संभाजीनगर शहर

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): PRAVINA TARACHAND YADAV

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): PI

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner